# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./२६६४/२०१९ दि. १०/०७/२०१९

## परिपत्रक

**विषय:- लोक जैवविविधता नोंदवही (Peoples Biodiversity Register) तयार करण्यासाठी सहाय्य करण्याबाबत.**

संदर्भ :- प्रधान मुख्य वनसंरक्षण तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य जैव विविधता मंडळ, नागपूर यांचे पत्र क्र. म.रा.जै.वि.मं./कक्ष-३/लो.जै.वि.नोंदवही/३०८/१९-२० नागपूर, दिनांक ०४/०७/२०१९.

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयीन प्राचार्य, प्राध्यापक, महाविद्यालयीन विद्यार्थी व सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, केंद्र शासनाने जैवविविधता अधिनियम २००२ (Biological Diversity Act, २००२) ची अंमलबजावणी सन २००३ पासून संपूर्ण देशामध्ये सुरू केली आहे. जैवविविधता अधिनियम २००२ चे मुख्य उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहे.

१. जैवविविधतेचे संवर्धन करणे.
२. जैविक संसाधनाचा शाश्वत वापर करणे.
३. जैव संसाधनाच्या व्यावसायीक वापरातून मिळणाऱ्या फायद्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेला समन्यायी लाभांश वाटप करणे.

वरील उद्दिष्टे साध्य करण्याकरीता जैवविविधता अधिनियम २००२ मधील कलम ४१ अंतर्गत प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेला जैवविविधता व्यवस्थापन समिती स्थापन करणे बंधनकारक असून समितीच्या मार्फत लोक जैवविविधता नोंदवही तयार करावयाची आहे. त्याअनुषंगाने सोबत संलग्नित पत्राचे अवलोकन करून आपल्या महाविद्यालाव्दारे आवश्यक कार्यवाही घ्यावी. तसेच अधिक माहिती करीता खालील कार्यालयाशी संपर्क साधावा.

**संपर्क अधिकारी** : श्रीमती कल्पना टेमगिरे, विभागीय वन अधिकारी (जैवविविधता), म.रा.जै.वि.मंडळ,
**मोबाईल**: ७५८८०३६७८१ **ई-मेल**: msbb.ngp@gmail.com

१०/७/२०१९

**कुलसचिव (प्र)**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

सहपत्र:- संदर्भिय पत्र

**प्रतिलिपी माहितीस्तव अग्रेषित:-**

१. मा. कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरू यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. विभाग प्रमुख, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

Yogesh 003/Let.

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
कुलगुरूंचे कार्यालय
आवक क्र. 1370 दि. 09/7/19
जावक क्र. 1789 दि. 09/7/19

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 4330 दि. 10/7/19
जावक क्र. 6880 दि. 16/7/19

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. ...... दि. ............
जावक क्र. 6576 दि. 8/7/19


# महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ

## MAHARASHTRA STATE BIODIVERSITY BOARD

(Established under section 22 of the Biological Diversity Act, 2002)

msbb.ngp@gmail.com; 0712-2522982 / 84; maharashtrabiodiversityboard.gov.in

जैवविविधता भवन, कदीमबाग, सिव्हील लाईन्स, नागपूर Jaiv Vividhata Bhavan, Kadimbag, Civil Lines, Nagpur 440001


गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 2586 दि. 16/7/19
जावक क्र.............दि............

क्र.म.रा.जै.वि.मं/कक्ष-३/लो.जै.वि.नोंदवही/306/१९-२०
नागपुर, दिनांक 08/06/2019

प्रति,

कुलगुरू (सर्व) — यादी प्रमाणे
महाराष्ट्र राज्य.

विषय : लोक जैवविविधता नोंदवही (Peoples Biodiversity Register) तयार करण्यासाठी सहाय्य करण्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, केंद्र शासनाने जैवविविधता अधिनियम, २००२ (Biological Diversity Act, २००२) ची अंमलबजावणी सन २००३ पासून संपूर्ण देशामध्ये सुरू केली आहे.

जैवविविधता अधिनियम २००२ चे मुख्य उद्दिष्टे खालील प्रमाणे आहे.

१. जैवविविधतेचे संवर्धन करणे.

२. जैविक संसाधनाचा शाश्वत वापर करणे.

३. जैव संसाधनाच्या व्यावसायीक वापरातून मिळणाऱ्या फायद्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेला समन्यायी लाभांश वाटप करणे.

वरिल उद्दिष्टे साध्य करण्याकरिता जैवविविधता अधिनियम २००२ मधील कलम ४१ अंतर्गत प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेला जैवविविधता व्यवस्थापन समिती स्थापन करणे बंधनकारक असून, समितीच्या मार्फत लोक जैवविविधता नोंदवही (PBR) तयार करावयाची आहे. लोक जैवविविधता नोंदवही मध्ये जैवविविधतेच्या संबंधी प्राणी / वनस्पती /सुक्ष्मजीव तसेच अजैविक घटक जसे पाणी, माती इत्यादी संबंधीची माहिती त्या नोंदवहीत करावयाची आहे. सदरहू माहिती ही विज्ञान शाखेशी संबंधीत असून, वाणिकी / वन्यजीव / जैवविविधता / पर्यावरण / हवामान बदल / तापमान बदल / सुक्ष्मजीव शास्त्र इत्यादी विषय हे विद्यापीठ स्तरावर अभ्यासक्रमाचा भाग म्हणून शिकविले जातात. नियमानुसार स्थानिक सवराज्य संस्था स्तरावर लोक जैवविविधता नोंदवही तयार करण्याची जबाबदारी हि ग्राम सभेने निवडलेल्या जैवविविधता व्यवस्थापन समिती कडून करावयाची आहे. तथापी यामध्ये बऱ्याच प्रकारच्या वैज्ञानिक बाबी गुंतल्या असल्यामुळे लोक जैवविविधता नोंदवही तयार करतांना सदस्य / सचिव / अध्यक्ष यांना अडचण निर्माण होत आहे. सध्या महाराष्ट्रात २८५५० स्थानिक स्वराज्य संस्था असून त्या ठिकाणी

लोक जैवविविधता नोंदवही तयार करावयाची आहे. एक लोक जैवविविधता नोंदवही तयार करण्याकरिता साधारणत: एक वर्षाचा कालावधी अपेक्षित असून महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाद्वारे रू. ६०,०००/- निधी हा नोंदवही तयार करण्याकरिता दिला जातो. विद्यापीठ स्तरावर पदवीचा अभ्यासक्रम पूर्ण करीत असतांना विद्यार्थ्यांना RAWE (Rural Agriculture Work Experience) साठी सहा महिने एखाद्या गावात जाऊन राहावे लागते. अशा वेळी या विद्यार्थ्यांकडून त्या गावाची लोक जैवविविधता नोंदवही तयार करण्यासाठी सहकार्य लाभले तर महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाद्वारे लोक जैवविविधता नोंदवही तयार करण्याच्या प्रक्रियेला चालना मिळेल व त्याचा आर्थिक तसेच शैक्षणिक लाभ संबंधीत विद्यार्थी / प्राध्यापक / महाविद्यालय / शैक्षणिक संस्था यांना होईल. महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे कार्यक्षेत्र हे संपूर्ण महाराष्ट्र राज्य असून सर्वच स्थानिक स्वराज्य संस्था स्तरावर लोक जैवविविधता नोंदवही तयार करावयाची आहे.

तरी कृपया आपल्या अधिनिस्त असलेल्या महाविद्यालयांना आपल्या स्तरावरून निर्देश देऊन या राष्ट्रीय कार्यास सहकार्य करण्यास विनंती आहे. पुढील माहिती करिता कृपया या कार्यालयाशी संपर्क साधावा.

**संपर्क अधिकारी :** श्रीमती कल्पना टेमगिरे, विभागीय वन अधिकारी (जैवविविधता), म.रा.जै.वि.मंडळ.

**मोबाईल :** ७५८८०३६७८१, **ई-मेल :** msbb.ngp@gmail.com

(जीत सिंग)
प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा
सदस्य सचिव
महाराष्ट्र राज्य जैव विविधता मंडळ

प्रतिलिपी —

१. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ.

२. प्रभारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, उप कार्यालय, पुणे.